प्रेसनोट                                   दिनांक – ०९/११/२०१६

## ट्रक चोरी ट्रक करणारे विरार ठाणे येथील दोघेजण जेरबंद आठ लाखाचा ट्रक जप्त

दिनांक – ०८/११/२०१६ रोजी खडक पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी हददीमध्ये गस्त घालत असताना सहायक पोलीस फौजदार विजय कांबळे यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की विरार ठाणे येथे राहणारे दोघेजण त्यांचेजवळील चोरीचा ट्रक विक्री करण्यासाठी टिंबरमार्केट भवानी पेठ पुणे याठिकाणी येणार आहे अशी माहीती मिळाल्यावरुन पोलीसांनी टिंबर मार्केट भवानी पेठ पुणे याभागात सापळा लावुन साफीका लेन न्यु टिंबर मार्केट भवानी पेठ पुणे येथे ट्रक व त्यामधील संशयीत इसम अनं १ रामसुनील रामशंकर विश्वकर्मा वय – ३५ मुपो - बनकटा पोस्ट – गैरा जिल्हा – सिध्दार्थनगर उत्तरप्रदेशय हल्ली विरार फाटा वसई ठाणे अनं २ रामानंद गुन्दे सहाणी वय - ३५ रा – नागचवरी ता - इटावा जिल्हा – सिध्दार्थनगर उत्तरप्रदेश हल्ली नायगाव हायवे जिल्हा ठाणे यांना ताब्यात घेतले त्यावेळी त्यांचे ताब्यात मिळालेला आठ लाख रुपये किंमतीचा टाटा कंपनीचा ट्रक नं एमएच०४/एफडी०१५७ संशयावरुन जप्त केला आहे. त्यावेळी ट्रकचा मुळ नंबर खोडुन त्यामध्ये खाडाखोड केल्याचे आढळुन आले ते दोघेजण परराज्यातील रहिवासी असल्याने व त्यांनी ट्रक चोरुन आणलेला असल्याची खात्री झाल्याने त्यांचेकडे पोलीसांनी सखोल केला त्यावेळी त्यांनी तो ट्रक वसई जिल्हा - पालघर येथुन चोरल्याचे सांगीतले.

सदरबाबत अधिक तपास केला असता ट्रकचे मुळ मालक श्री विलास सुर्यभान शिर्के वय – २९ रा – पेल्हार बटरपाडा नालासोपारा पुर्व ता - वसई जिल्हा – पालघर हे आहेत त्यांचा ट्रक चोरीस गेलेबाबत वालीव पोलीस स्टेशन जिल्हा पालघर याठिकाणी तक्रार दिलेली आहे त्याबाबत गु र नं – ६३९/२०१६ भा. दं. वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याने आरोपी व ट्रक तेथे नेमणुकीस असलेले पोलीस नाईक आयुब शेख यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे सदर आरोपी हे ठाणे व पालघर जिल्यामध्ये वाळुच्या गाडीवर वेगवेगळया ठिकाणी ड्रायव्हर म्हणुन काम करतात त्यांनी अशाप्रकारे अनेक ठिकाणचे मालट्रक ते चोरुन राज्यात परराज्यात विक्री केली असण्याची किंवा विल्हेवाट लावल्याची शक्यता आहे त्याबाबत संबधीत पोलीसांना कळविण्यात आलेले आहे.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री सुधीर हिरेमठ, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. प्रविण कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली श्री रघुनाथ जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन पुणे , श्री संभाजी शिर्के पोलीस निरीक्षक (गुन्हे) खडक पोलीस स्टेशन पुणे व तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड, आनंत व्यवहारे, पोलीस कर्मचारी विजय कांबळे , पोहवा अजय थोरात , विशाल शिंदे , बशीर सैय्यद , इम्रान नदाफ , महेश कांबळे यांनी केली आहे.


MH.04